प्रकरण दुसरे

# स्त्रियांचे कादंबरी लेखन स्वरुप आणि विशेष

## प्रकरण दुसरे

# स्त्रियांचे कादंबरीलेखन स्वरुप आणि विशेष


०१ प्रास्ताविक

०२ स्त्री साहित्याचा प्रारंभ

०३ स्त्रियांचे कादंबरी लेखन

०४ स्त्रियांच्या कादंबरी लेखनाचे स्वरुप :-

४.१ स्वातंत्र्यपूर्व कालखंड

४.२ स्वातंत्र्योत्तर कालखंड

०५ समारोप

०६ संदर्भसूची

प्रकरण दुसरे

# स्त्रियांचे कादंबरी लेखन स्वरुप आणि विशेष

## ०१ प्रास्ताविक

भारतीय परंपरेने स्त्रिया जरी देवतास्वरुप आहेत असे मानलेले असले तरीही आज २१ व्या शतकातही स्त्रीला समाजात दुय्यमत्वाचीच वागणूक दिली जाते. मानवजातीच्या इतिहासाइतकाच स्त्री जातीवरील अत्याचार सनातन आहे. जन्माला आलेल्या प्रत्येक स्त्रीला जीवनात मुलगी, पत्नी, आई, सून, सासू अशा वेगवेगळ्या भूमिका पार पाडाव्या लागतात आणि या अशा जबाबदाऱ्या पार पाडत असतानाच स्त्री ही पुरुषाची गुलाम बनत गेली. राजा राममोहन रॉय यांच्यापासून महर्षी कर्वे यांच्यापर्यंत समाजसुधारकांनी स्त्री शुद्रांच्या दास्य विमोचनाची चळवळ चालवली. त्यामुळे बालविवाह, जरठ–बालविवाह, पुनर्विवाह प्रतिबंध, परितक्त्या, विधवा, कुमारीमाता यांच्यावरील अन्याय, हुंडा प्रथा, बालहत्या अशा अनिष्ठ रुढी आणि प्रथांविरुद्ध जागृती निर्माण झाली. म. फुले यांच्या योगदानाने मुलींना शिक्षण मिळू लागले. त्यामुळे त्यांच्या अनुभूतींचे क्षीतिज विस्तारले. आपले सुख, दुःख, आपल्या अनुभूती, भोवतालची सुख–दुःख त्या शब्दबद्ध करु लागल्या व त्यातूनच समाजामध्ये त्यांना मिळणाऱ्या दुय्यम दर्जाचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यातून उमटू लागले. गेल्या दीड–दोनशे वर्षात स्त्रियांनी विविध विषयांवर विपूल असे लेखन केले आहे आणि आपल्या या योगदानाने त्यांनी मराठी वाङ्मयाच्या दालनात महत्वपूर्ण भर घातली आहे.

**०२ स्त्री साहित्याचा प्रारंभ :-**

आद्य कवयित्री महदंबा यांच्या ध्वळ्यापासून खऱ्या अर्थाने स्त्री साहित्याला प्रारंभ होतो. तेव्हापासून सुरु झालेली ही स्त्रियांच्या लेखनाची परंपरा मुक्ताबाई, जनाबाई, तुकाराम शिष्या बहिणाबाई अशा दिशेने विभावरी शिरुरकर, गौरी देशपांडे, शांता गोखले, मेघना पेठे यांच्यापर्यंय येऊन पोहचते.

स्त्रियांच्या साहित्याचा विचार करता प्रथम कवितेतून त्यांनी आपल्या भावना प्रकट केल्या. १९१३ साली कृष्णाबाई गाडगीळ यांचा स्वतंत्र कवितांचा 'मानसगीतसरोवर' हा पहिला स्त्रियांचा कवितासंग्रह प्रकाशित झाला. येथपासून सुरु झालेला कवितेचा प्रवाह लक्ष्मीबाई टिळक, पद्मा, इंदिरा संत, संजिवनी, शांता शेळके आदी कवियित्रींनी आधुनिक कवितेच्या प्रांगणात नेऊन सोडलेला दिसतो.

कथेच्या बाबतीत बोलायचे झाले तर, हरिभाऊ आपटे यांच्या कथालेखनाला जी मोठी लोकप्रियता मिळाली ती पासून प्रेरणा घेऊन अनेक स्त्रिया कथालेखन करु लागल्या. १९२१ साली काशिबाई कानिटकर यांचा 'चांदण्यातल्या गप्पा' हा पहिला कथासंग्रह निघाला आणि त्यानंतर घटनाप्रधानतेकडून व्यक्तिचित्रणाकडे आणि पुढे मनोविश्लेषणाकडे कथालेखिका वळू लागलेल्या दिसतात. कादंबरी लेखनाची सुरुवात इ. स. १८७३ मध्ये साळूबाई तांबवेकरांच्या 'चंद्रप्रभाविरहवर्णन' या कादंबरीपासून झाली आणि कथेचा मर्यादित परीघ ओलांडून स्त्रियांनी कादंबरी लेखनाच्या क्षेत्रात प्रवेश केला असे दिसते.

'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' हे रमाबाई रानडे यांचे आत्मचरित्र हे स्त्रीने लिहिलेले पहिले आत्मचरित्र. आत्मचरित्राचा हाच प्रवाह लक्ष्मीबाई टिळक, बाया कर्वे, पार्वतीबाई आठवले, लिलाबाई पटवर्धन यांसारख्या स्त्रियांनी वैविध्यपूर्व जीवनदर्शने घडवीत पुढे नेलेला दिसतो.

स्त्रियांनी लिहिलेल्या चरित्रांची संख्या मात्र मर्यादित आहे. तरीही या लेखनामध्ये त्यांनी आपले सामर्थ्य व्यक्त केले आहे. स्त्रियांनी लिहिलेले पहिले नाटक म्हणजे इ. स. १८९४ मध्ये प्रकाशित झालेले सोनाबाई केरकर यांचे 'संगीत छत्रपती संभाजी' नाटक हे होय. परंतु, वाङ्मयाच्या इतर क्षेत्रांमध्ये स्त्रीने जसा स्वत:चा ठसा उमटवलेला दिसतो तसा नाटक आणि एकांकिका या प्रकारांमध्ये ती उमटवू शकलेली नाही.

ललित गद्याच्या क्षेत्रात स्त्रियांचे लेखन संख्यात्मकदृष्टीने कमी असले तरी दुर्गा भागवत, इरावती कर्वे, कुसुमावती देशपांडे, शकुंतला परांजपे इ. लेखिकांनी आपली नाममुद्रा कायमची उठवली आहे. वैचारिक लेखनात मात्र स्त्रिया आपला ठसा उमटवू शकल्या नाही. १९०६ साली मिस मेरी थोर यांनी अभिनय करुन गाता येतील अशा कवितांचा संग्रह मुलांसाठी तयार केला व त्यानंतर बाल साहित्याच्या क्षेत्रात सकस लेखन करणाऱ्या अनेक स्त्रिया पुढे आल्या. परभाषेतील साहित्यही सुशिक्षित स्त्रिया मराठीत आणू लागल्या.

अशाप्रकारे महदंबेच्या धवळ्यापासून प्रारंभ झालेले स्त्रियांचे साहित्य विविधांगी विस्तारत गेले.

**०३ स्त्रियांचे कादंबरी लेखन : -**

मराठीमध्ये कादंबरी हा वाङ्मय प्रकार एकोणिसाव्या शतकात जन्माला आला. जीवनातील बहुविध समस्यांना, विविध भावभावनांना, घटना-प्रसंगांना आणि कालखंडानाही सामावून घेण्याचे सामर्थ्य कादंबरी वाङ्मयात आहे. मराठी वाङ्मयात कादंबरी लेखनास जरी पुरुषवर्गाकडून सुरुवात झाली असली तरी स्त्रियांचाही कादंबरी लेखनात महत्वाचा वाटा आहे. महात्मा गांधींनी स्वातंत्र्य चळवळीत झोकून देण्यासाठी स्त्रियांना केलेले आवाहन तसेच शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्यामुळे

दैनंदिन, साध्यासुध्या आयुष्यातील आपल्या अनुभवांना शब्दबद्ध करण्याचा आत्मविश्वास काही स्त्रियांमध्ये निर्माण झाला आणि अत्यंत जिव्हाळ्याच्या व प्रत्यही अस्वस्थ करणाऱ्या समस्या मांडण्यासाठी त्यांनी कादंबरीचा आश्रय घेतला. स्त्रियांच्या कादंबरी लेखनाविषयी बोलताना रेखा इनामदार-साने आपल्या लेखात म्हणतात, एखाद्या व्यक्तीची अथपासून इतीपर्यंत जीवनकहाणी सांगण्यास तसेच मनात खळबळ माजविणारे नानाविध विचार अनिर्बंधपणे प्रकट करण्यास 'कादंबरी' हा साहित्यप्रकार त्यांना अधिक जवळचा, सोयिस्कर वाटला असावा. [१] यावरुन स्त्रियांच्या कादंबरी लेखनाचे नेमके स्वरुप काय असेल हे ही आपल्या लक्षात येते.

**०४ स्त्रियांच्या कादंबरी लेखनाचे स्वरुप :**

**४.१ स्वातंत्र्यपूर्व कालखंड :-**

स्त्रियांच्या कादंबरी लेखनाचा स्वातंत्र्यपूर्व कालखंड तपासत असताना १८७३ पासून त्यांच्या कादंबरी लेखनाला सुरुवात झालेली दिसून येते. आरंभकालीन लेखिकांना राजे-महाराजांच्या शौर्यकथा, प्रेमकथा यांचे आकर्षण होते. पण पुढे मात्र स्त्रीच्या वास्तव जीवनातील विविध घटनाप्रसंगाकडेही लेखिका वळल्या. ह. ना. आपटे, श्री. व्यं. केतकर, वा. म. जोशी यांचा प्रभाव प्रारंभीच्या काही कादंबऱ्यांवर आढळतो तर पुढे ना. सी. फडके, वि. स. खांडेकर यांचे अनुकरण कुमुदिनी रांगणेकर, लीला देशमुख यांच्या कादंबऱ्यांतून दिसते.

स्त्रीने स्वतंत्रपणे कादंबरीरुपाने केलेला लेखनाचा पहिला प्रयत्न म्हणजे १८७३ मध्ये प्रकाशित झालेली साळूबाई तांबवेकर यांची 'चंद्रप्रभाविरहवर्णन' ही कादंबरी. या कादंबरीविषयी बोलताना डॉ. भालचंद्र फडके यांनी, 'साळूबाई तांबवेकर यांनी लिहिलेल्या चंद्रप्रभाविरहवर्णन कादंबरी अद्‌भूतरम्य शृंगारकथेचा मालमसाला

आहे. ' असे म्हटले आहे. [२] ही कादंबरी म्हणजे स्त्री लेखिकांच्या व्यापक, बहुरंगी कादंबरी वाङ्मयाचा पाया रोवणारी कादंबरी आहे.

या पहिल्या कादंबरीनंतर अनेक लेखिकांनी सामाजिक, अद्‌भूतरम्य, ऐतिहासिक, अनुवादित अशा विविध स्वरुपी व परिणामकारक अशा कादंबऱ्यांचे लेखन करुन स्त्रियांच्या कादंबरी लेखनाच्या पायाची भक्कम उभारणी केली. या त्यांच्या पायावरच आजचं स्त्रियांच्या कादंबऱ्यांत विस्तारलेलं सजविलेलं भव्य दालन मोठ्या डौलात उभं आहे.

**सामाजिक कादंबऱ्या :-**

१८५० ते १९५० या कालखंडातील काशिबाई कानिटकरांची 'रंगराव' (१९०३) ही स्त्रियांची पहिली व श्रेष्ठ सामाजिक कादंबरी ठरते. ही संसाररुप कादंबरी कागदावर आणून त्यातून त्यांनी स्त्री शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. यानंतर जनकीबाई देसाई यांनी हुंडापद्धतीचा निषेध करणारी 'गृहलक्ष्मी' (१९१५), 'स्त्रीधर्म' सांगण्यासाठी 'प्रेमळ सवत' (१९१७), 'सौभाग्यतिलक' (१९१८) पातिव्रत्याची कसोटी (१९१९) इ. कादंबऱ्या लिहिल्या.

१९२० नंतरच्या पंचवीस वर्षात म्हणजे १९५० सालपर्यंतच्या कादंबऱ्यात स्त्रीसमस्यांचे चित्रण व दिग्दर्शन करण्यावरच लेखिकांचा भर दिसतो. समाजात असलेले स्त्रीचे स्थान व स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोण त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून दाखवून दिला आहे. त्यामुळे कधी विधवांची दूरवस्था वर्णन करण्यासाठी यशोदाबाई भट लिखित 'मुलांचे बंड अथवा प्रतिज्ञाभंग' (१९२१) सारखी कादंबरी, कधी हिंदू धर्मातील चालीरितींचा, धर्माच्या नावाखाली चाललेल्या ढोंगीपणाचा निषेध करण्यासाठी शांताबाई नाशिककर यांची 'हाच का धर्म' (१९३०) सारखी कादंबरी, कधी हुंड्याचा प्रश्न मांडण्यासाठी 'लग्नाचा बाजार' (१९२९)

सारखी कादंबरी, कधी घटस्फोटाची आवश्यकता प्रतिपादन करणारी कमलाबाई बंबेवाले यांची बंधमुक्ता (१९३०) सारखी कादंबरी तर कधी इंदिराबाई सहस्त्रबुद्धे यांची 'बाळूताई धडा घे' (१९३१) सारखी 'स्त्री–पुरुष' समानतेचा पुरस्कार करण्याच्या हेतूने लिहिलेली कादंबरी अशा कादंबऱ्या म्हणजे स्त्री आता अन्यायाविरुद्ध जागृत झाली आहे आणि स्वअस्तित्व निर्माण करण्याच्यादृष्टीने तिची वाटचाल चालू आहे असा समाजाला जणू इशाराच देणाऱ्या आहेत. स्त्रीच्या सहनशिलतेचा अंत झाल्यावर अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा खंबीरपणाही लेखिकांनी दाखवला त्यात विभावरी शिरुरकरांचं महत्वाचं स्थान आहे. त्यांच्या कादंबरी लेखनाविषयी वसंत बिरादार म्हणतात, 'स्त्रीमनाच्या विविध धाग्यांचे बंडखोर चित्र कलात्मक पद्धतीने करुन कादंबरीला वेगळे वळण लावले ते विभावरी शिरुरकर यांनी.[३] त्यांच्या हिंदोळ्यावर (१९३४) या कादंबरीने स्त्रीचा माणूस म्हणून विचार करण्याची दृष्टी दिली. ही कादंबरी एका पतिसुखाला वंचित झालेल्या स्त्रीच्या मनातील वैचारिक आंदोलन घेऊन येते. म्हणून दु. का. संत यांनी 'ही कादंबरी महाराष्ट्रीय स्त्रीच्या विचारक्रांतीच्या दृष्टीने प्रातिनिधिक आहे असे म्हणावयास हरकत नाही. '[४] असे म्हटले आहे. त्यानंतर त्यांनी 'विरलेले स्वप्न' (१९३५) ही कादंबरी लिहिली. एकंदरित विभावरी शिरुरकरांच्या कादंबरीचे स्वरुप सांगताना कुसुमावती देशपांडे म्हणतात, 'कळ्यांचे नि:श्वास मधील वेगवेगळ्या नायिका, 'हिंदोळ्यावर' मधील अचला व 'विरलेल्या स्वप्नातील राहिणी या सर्वांमध्ये विभावरी शिरुरकरांनी स्त्री जीवनाचा एक विशिष्ट नमुना दाखविण्याचा सुसंघटित प्रयत्न केला आहे. '[५] त्यानंतर कुमुदिनी प्रभावळकर यांनी 'अनियमित जग' (१९३४), वेश्येच्या जीवनावर आधारित 'निर्माल्यातील कळी' (१९३५) यासारख्या कादंबऱ्या लिहिल्या.

१९२० पासून स्त्री लेखिकांनी आपल्या कादंबऱ्यांतून स्त्री-शिक्षण, स्त्री-स्वातंत्र्य हे विषय हाताळले. त्याचबरोबर अन्यायकारक धार्मिक रुढी, परंपरा, चालीरिती यांचा निषेध तसेच स्वातंत्र्य चळवळींची नोंदही या कादंबऱ्यांतून येते. परंतु, १९३५ नंतर सर्व परिस्थिती बदलली. राजकारण, अर्थकारण, धर्मकारण, कुटुंबसंस्था यांच्यातील बदलाप्रमाणेच साहित्य, नाट्य, चित्रपट, संगीत, शिल्प आदी कलांमध्येही नवे बदल घडून आले. विवाह पद्धती व कुटुंब जीवन यामध्येही काही मूलभूत फरक होवू लागले. विधवाविवाह, रजिस्टर विवाह, घटस्फोटाचा कायदा यांना मान्यता मिळाल्यामुळे परितक्तेची अवहेलना थोड्याफार प्रमाणात कमी झाली. वैज्ञानिक, आर्थिक, राजकीय विकासाबरोबरच, स्त्रीच्या अनुभवाच्या कक्षाही रुंदावल्या आणि समाजातील हे सर्व बदल वाङ्मयातून उमटू लागले.

या कालखंडातील स्त्रियांच्या कादंबऱ्यांतून स्त्रियांची दु:ख अधिक सुक्ष्मतेनं व्यक्त झालेली दिसतात. गीता साने यांनी स्त्री-स्वातंत्र्याशी निगडित असलेल्या वेगवेगळ्या समस्या आपल्या कादंबऱ्यांतून हाताळल्या आहेत. निखळलेली हिरकणी (१९३६), वठलेला वृक्ष (१९३६), हिरवळीखाली (१९३९), दीपस्तंभ (१९४७) या विविध कादंबऱ्यांतून कौटुंबिक संबंध, स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा पती-पत्नी संबंधांवर होणारा परिणाम, आर्थिक स्थितीचा संततीसंख्येशी असलेला संबंध इ. कितीतरी समस्या हाताळल्या आहेत. त्यांच्या कादंबरीचे हे स्वरुप पाहिल्यावर 'स्त्री स्वातंत्र्याशी निगडित असलेल्या वेगवेगळा प्रश्नांच्या विचारातून त्यांची कथासरिता उगम पावते व राजकीय विचारप्रणालींची वळणे घेऊन ती आज समाजजीवनाच्या आर्थिक विश्लेषणापर्यंत पोहोचलेली आहे.' [६] हा कुसुमावती देशपांडे यांचा अभिप्राय आपल्याला पटू लागतो. या कालखंडातील प्रेमा कंटक यांच्या काम आणि कामिनी (१९३७) आणि 'आग्नियान' (१९४२) या कादंबऱ्यात गांधीवादाची पार्श्वभूमी

आलेली आहे. याबरोबरच शांताबाई नाशिककर यांची 'चिखलातले कमळ' (१९३९) मालतीबाई दांडेकर यांची 'मातृमंदिर' (१९४१) कृष्णाबाई मोटे यांची 'मिनाक्षीचे जीवन' (१९४२) या ही या कालखंडातील उल्लेखनीय अशा कादंबऱ्या आहेत.

एकंदरित कुसमावती देशपांडे यांचे, जे स्त्रियांनाच बोचेल व जे पुरुष लेखकांना शोधूनही दिसणार नाही, अशा अनुभूतीची एखादी स्पर्शच्छटा तरी या बहुतेक कथांमध्ये दिसून येते. [७] हे म्हणणे प्रेमा कंटक यांच्या 'काम आणि कामिनी', 'आग्नियान', शकुंतला परांजपे यांच्या 'घराचा मालक', मालतीबाई दांडेकर यांच्या काटेरी मार्ग (१९४८), सुधा साठे यांच्या 'पुसलेली चित्रे' (१९४८) या कादंबऱ्यांमधून प्रत्ययास येते. अशाप्रकारे १९५० पूर्वीच्या सामाजिक कादंबऱ्या ह्या जशा समस्याप्रधान आहेत तशाच बोधवादीही असल्याचे दिसून येते.

**अद्‌भूतरम्य कादंबऱ्या :-**

१८८५ पासूनच्या अद्‌भूतरम्य कादंबऱ्यांचा विचार करता 'हिंदुस्थानातील तारा' (१८९४) ही कादंबरी म्हणजे मराठीतील अद्‌भूतरम्य कादंबऱ्यांचा मानदंड ठरावी अशी आहे. लेखकांपेक्षाही साळूबाई तांबवेकरांची अद्‌भूतरम्यतेची झेप कशी विलक्षण आहे याची साक्ष पटविणारी अशी ही त्यांची कादंबरी आहे. तर प्रीतीचा मोबदला अथवा पुष्पगुच्छ आणि वनमाला (१८९०) ही पंडित गोदावरीबाई यांची कादंबरी अद्‌भुताच्या आणि वास्तवाच्या सीमारेषेवरची अशी कादंबरी आहे.

**ऐतिहासिक कादंबऱ्या :-**

लेखिकांमध्ये अद्‌भुदाचं आकर्षण फार काळ टिकलं नाही आणि त्यांचं मन इतिहास जाणून घेण्याच्या आकांक्षेने धावू लागलं व त्यातून ऐतिहासिक कादंबऱ्यांचा जन्म झाला. स्त्रियांच्या ऐतिहासिक कादंबरी लेखनाची सुरुवात सौ. अनुसयाबाई देशपांडे यांच्या 'वसईचा वेढा' या कादंबरीने इ. स. १९१२ मध्ये झाली. या कादंबरीत

तत्कालिन परिस्थिती लेखिकेने परिणामकारकरितीनं आणि ऐतिहासिक वातावरण निर्मिती करुन वर्णिलेली आहे. त्यानंतरची शांताबाई नाशिककर यांची 'कौमुदी' (१९२६) रजपुतांच्या आपापसातील वैमनस्याचा परिचय करुन देते तर 'साम्राज्यासाठी' (१९३१) ही त्यांची कादंबरी विजयनगरच्या सम्राटपदासाठी पिता-पूत्र, भाऊ-भाऊ यांच्यातील कारस्थान आणि त्यातच पुन्हा परकीय आक्रमणाचा धोका हा विषय घेऊन येते तर कुमुदिनी प्रभावळकर यांची 'शकुनी मोहन' (१९३२) ही कादंबरी अठराव्या शतकाच्या उत्तरार्धातील मराठ्यांच्या व रजपुतांच्या वैमनस्याचं दर्शन घडविणारी आहे. त्यानंतरच्या काळात लेखिकांचं इतिहासाकडे दुर्लक्ष झालेले दिसते. १९३५ ते १९५० च्या दरम्यान आनंदीबाई जयवंत यांची 'चितोडचा चंद्र' ही रजपुतांच्या वचनपूर्तीच्या बाण्याचं दर्शन घडविणारी एकमेव कादंबरी दृष्टिस पडते. एकंदरित हे लेखन उल्लेखनीय, सरस, प्रशंसनीय आहे. यातून इतिहासाची जाण असल्याचा प्रत्यय येतो. लेखिकांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांचा विचार करताना त्यांच्यात विषय वैचित्र्य तर आहेच पण त्या-त्या काळातील ऐतिहासिक वातावरण निर्मितीही मोठ्या कुशलतेने केली असल्याचे दिसून येते.

**अनुवादित कादंबऱ्या :-**

या कालखंडातील लेखिका व्यक्तिगत जीवन, त्या जीवनातले अनेक प्रश्न, सुख-दु:ख, सामाजिक प्रश्न, पारतंत्र्य इ. विषयीचा विचार करीत असतानाच इतर भाषांतील वाङ्मयाकडेही वळलेल्या दिसतात. सौ. सरस्वतीबाई भिडे यांनी श्रीयुत दामोदर मुखोपाध्याय प्रणित 'माओमेये' च्या आधारे आपली 'सरोजिनी' (१९०९) ही कादंबरी लिहिली तर कमलाबाई किबे यांनी श्रीयुत किशोरीलाल गोस्वामी यांच्या मूळ हिंदी पुस्तकाच्या आधारे 'राजकुमारी' (१९१२) ही कादंबरी लिहली. जानकीबाई देसाईंची 'चारुगात्री' अथवा आंग्लसत्तेचा उदय (१९२०) ही याच

प्रवाहातील एक कादंबरी आहे. 'केवळ ध्येयासाठी' (१९२४) ही अनुवादित सामाजिक कादंबरी Grant Allen च्या 'The woman who Did' या कादंबरीचं स्वैर रुपांतर होय. १९२० ते ३५ च्या दरम्यान ही एकमेव अनुवादित कादंबरी लिहिली गेली. १९३५ ते ५० च्या दरम्यानही मोजक्याच अनुवादित कादंबऱ्या प्रसिद्ध झालेल्या दिसतात. त्यातील 'दिव्यचक्षू' (१९३६), 'छायानट' (१९४४) आणि 'पूर्णिमा' (१९४४) ही रत्नप्रभा रणदिवे यांची रमणलाल देसाई यांच्या कादंबऱ्यांची केलेली भाषांतरे होत. कु. कमल दीक्षित यांची 'निष्कलंक' (१९३९), मालती चोळकर यांची 'चित्रलेखा' (१९४६) या ही या कालखंडातील उल्लेखनीय अशा अनुवादित कादंबऱ्या आहेत.

अशाप्रकारे अनुवादित कादंबऱ्या म्हणजे स्त्रियांच्या मर्यादित जीवनाला, लेखनाला, वाङ्मयीन अनुभूतीला फुटलेला एक नवीन अंकुर, त्यांच्या विकासाचा एक महत्वाचा टप्पा म्हणता येईल.

एकंदरित स्त्रियांच्या कादंबरीचं हे विस्तृत स्वरुप पाहून दु. का. संत म्हणतात, 'त्यांच्या कादंबऱ्यांवरुन महाराष्ट्रीय स्त्री खरोखर जागृत झाली आहे. विविध प्रकारच्या दास्यांतून ती धडाडीने पुढे येत आहे. समाज जीवनाच्या साकल्यासाठीही ती बद्धपरिकर होत आहे. निदान माजघराच्या उंबरठ्याच्या बाहेर तर तिचे पाऊल पडले आहे असे निश्चितपणे म्हणता येते.'[८] या साऱ्या लेखिकांच्या कादंबरी लिहण्यामागच्या प्रेरणा या अंत:करणापासून आलेल्या सच्च्या होत्या. जे त्यांना सलत होतं, टोचत होतं, जुन्या-नव्या विचारांची जी आंदोलने डोक्यात गोंधळ माजवत होती ती अगदी प्रांजलपणे शब्दांकित करण्याचा प्रयत्न या लेखिकांनी केला आहे. स्त्री लेखिकांच्या जीवनाचा विचार केला तर त्यांच्या जीवनात प्रत्यक्षातच इतके कारुण्य भरले आहे की, त्यांना वाङ्मय लेखनासाठी तेच महत्वाचे वाटले पण त्यामागचे मूळ

कारण शोधून काढण्याचा प्रयत्न फार थोड्या लेखिकांनी केला. अशा लेखिकांमध्ये प्रेमाबाई कंटक, कृष्णाबाई मोटे, विभावरी शिरुरकर ह्यांचा उल्लेख करावा लागतो. ह्या लेखिकांच्या जीवनविषयक अशा व्यापक दृष्टिकोणामुळे त्यांच्या कृतींना एक वेगळीच धार आलेली आपल्या दृष्टिस पडते. या कालखंडातील कादंबऱ्यांमध्ये कौमार्य, सुवासिनी, विधवा या विविध अवस्थात स्त्रियांना सहन कराव्या लागणाऱ्या जाचाचे चित्रण आले आहे. दुष्टांचं निर्दालन आणि शेवटी सज्जनांना मिळालेला विजय दाखविणे हे या कालखंडातील बहुतेक कादंबऱ्यांचं उद्दिष्ट असलेलं दिसून येतं.

एकत्र कुटुंबातील स्त्रीचं स्थान, तिची दुःख, तिला कुटुंबात मिळणारी दुय्यमत्वाची वागणूक, तिच्या व्यथा, वेदना, कादंबरीच्या माध्यमातून व्यक्त झालेल्या दिसून येतात. तर काही कादंबऱ्यांमधून साऱ्या यातना निमूटपणे सहन करणारी, सामाजिक निती नियम आणि रुढी, परंपरांनी जखडलेली स्त्री दिसते. त्याचप्रमाणे समाजाला कठोरपणाने जाब विचारणारी स्त्री ही आपणास दिसते. तर कुठं वाचकाचं मनोरंजन करण्याकरिता अद्‌भुताच्या आहारी गेलेली लेखिका आपण पाहतो. काहींनी इतिहास जागा केलेला दिसतो तर काहींना परकीय वाङ्मय आपल्या भाषेत भाषांतरित करण्याची ओढ निर्माण झालेली दिसते. एकंदरित १८५० ते १९५० या कालखंडात स्त्रियांनी विषय, आशय, अभिव्यक्ती तंत्र, कादंबरी लेखनाचे प्रकार अशा सर्वच बाबतीत समर्थपणे आणि आत्मविश्वासानं पाऊल टाकलेलं आहे. सामाजिक नितीनियमांमुळे जीवनाला पडलेल्या मर्यादा, शिक्षणाची कमतरता यामुळे कादंबरी लेखनात थोड्या उणीवा दिसून येतात तरीही स्त्रियांच्या कादंबरी लेखनाला झालेली सुरुवात, त्या क्षेत्रातील त्यांची यशस्वी वाटचाल, त्यांनी लेखनात केलेले वेगवेगळे प्रयोग, विषयातील वैविध्य. हे सारं पाहता त्यांची ही कामगिरी कौतुकास्पद वाटते.

कोणत्याही प्रकारच्या अनुकरणाच्या आहारी न जाता स्त्रियांनी केलेलं हे कादंबरी लेखन खरोखरच वाखाणण्याजोगं आहे.

## या कालखंडातील स्त्रियांच्या कादंबरी लेखनाचे विशेष

इ. स. १८७३ पासून सुरु झालेले स्त्रियांचे कादंबरी लेखन समाजाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करणारे व विविध वैशिष्ट्यांनी युक्त असे झालेले दिसते. इ. स. १८५० ते १९५० या कालखंडातील स्त्रियांच्या कादंबरी लेखनाचा आढावा घ्यायचा झाल्यास खालीलप्रमाणे घेता येईल.

लेखकांच्या कादंबरी लेखनाची सुरुवात लक्ष्मणशास्त्री हळबे यांच्या मुक्तामाला (१८६१) या अद्‌भुतरम्य कादंबरीपासून झाली तशीच अवघ्या बारा वर्षांनी साळूबाई तांबवेकरांची 'चंद्रप्रभाविरहवर्णन' ही कादंबरी प्रसिद्ध झाली म्हणजे स्त्रियांच्या कादंबरी लेखनाची सुरवातही अद्‌भुतरम्य कादंबरीनेच झाली.

या कालखंडातील लेखिकांनी केवळ अनुकरणाच्या भूमिकेतून लेखन न करता आपल्याला मिळालेलं मोजकं शिक्षण, घरातलंच मर्यादित अनुभवविश्व, कादंबरीच्या क्षेत्रात त्यांनी टाकलेलं पहिलं पाऊल व ते पाऊल टाकताना त्यांच्या मनाची झालेली अवस्था त्यांनी आपल्या कादंबऱ्यातून व्यक्त केली आहे.

त्यांच्या अद्‌भुतरम्य, भाषांतरित, ऐतिहासिक, सामाजिक अशा सर्वच कादंबऱ्यांचा हेतू जनरंजन करता करताच बोध करावा असा होता. उदा. चंद्रप्रभाविरहवर्णन ही कादंबरी जरी अद्‌भुतरम्य असली तरी माणसाने नेहमी सदाचाराने वागावे असा बोध त्यातून केलेला दिसून येतो.

लेखिकांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांची सुरुवात आणि त्यात त्यांनी केलेली प्रभावी वाटचाल त्यांच्या विशाल दृष्टिकोणाची, विकासाची आणि कादंबरी लेखनकौशल्याची जाणीव करुन देते. त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या मुळाशी

पूर्वजांच्या पराक्रमाबद्दलची अथवा त्यांच्या गुणवैशिष्ट्यांबद्दलची आदराची भावना दिसून येते. त्याचबरोबर वाचकांना काहीतरी सांगण्याची तळमळही दिसून येते.

लेखिकांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांमध्ये उपलब्ध ऐतिहासिक माहिती, मुख्य कथानकाला उपकथानकांची दिलेली जोड, अनेक प्रकारची रहस्य, कट-कारस्थाने, गुंतागुंत आणि ऐतिहासिक सत्याला काल्पनिकतेची दिलेली जोड ह्या तत्कालिन ऐतिहासिक कादंबऱ्यांमध्ये आढळणाऱ्या सर्व गोष्टी आढळत असल्या तरीही अनुकरण न करता त्यांनी स्वतंत्र विषय निवडून स्वतंत्र अशा रचना केल्या.

ऐतिहासिक कादंबऱ्यांमध्ये स्त्रियांनी ऐतिहासिक सत्याचा वा घटनेचा धागा पकडून त्या अनुषंगाने कपटकारस्थान रहस्य, भ्रातृघात, पितृघात, वेषांतर, राजाज्ञा, स्वामिनिष्ठ सेवक, प्रतिज्ञा इ. साऱ्यांचा समावेश केला आहे. यावरुन व्यक्तिगत सुख-दु:खाचा विचार करणारी स्त्री देशाच्या इतिहासाचा मागोवा घेताना दिसते व त्यातूनच समकालीनांना मार्गदर्शन करण्याचाही प्रयत्न करते तेव्हा स्त्रियांमध्ये झालेल्या जागृतीची जाणीव होते.

या कालखंडातील लिहिल्या गेलेल्या सामाजिक कादंबऱ्या बोधवादी स्वरुपाच्या आहेत तशा समस्याप्रधानही आहेत. उदा. पत्नीव्रताची कसोटी, अघोर पातक, उजळलेला हिरा, जगाशी बंडखोरी, कुलकथा ह्या कादंबऱ्या बोधवादी, बऱ्या-वाईट प्रवृत्तीच्या नि माणसांचा सतत चाललेला संघर्ष रंगविणाऱ्या आहेत. नितीची शिकवणही या कादंबऱ्यांतून दिलेली दिसते.

या कालखंडातील लेखिकांनी मातृप्रेमाची महती पटवून देणाऱ्या त्याचबरोबर घरातल्या वडिलधाऱ्या मंडळीने लहान मुलांच्या भावनिक जोपासनेकडे दुर्लक्ष करता कामा नये हे निदर्शनास आणून देणाऱ्याही कादंबऱ्या लिहल्या. 'कुठे', 'फुलकथा' या सारख्या कादंबऱ्या यांची उदाहरणे म्हणून सांगता येतील.

स्त्रियांवर होणारा अन्याय, त्यांच्यावरची जाचक बंधनं, त्यांची पारंपरिक दु:ख, त्यांच्या विकासाचा विचार नि दिशा आणि विशेषत: घटस्फोटाची आवश्यकता इ. वर आधारित असलेल्या 'मूकनायिका', 'लग्नाचा बाजार', 'हाच का धर्म', 'पालखीचा गोंडा', 'बाळूताई धडा घे', 'हिंदोळ्यावर', 'बंधमुक्ता' यासारख्या स्त्रियांच्या कादंबऱ्या म्हणजे समाजाला आव्हानच आहेत.

स्त्रियांनी आपल्या लेखनातून स्त्रियांचे गुणगानच न करता दोषही दाखवून दिले आहेत. याचे उदाहरण म्हणून कु. पिरोजबाई आनंदकर यांच्या 'माझे बाळ ते!' या कादंबरीचे देता येईल.

स्त्रिया मर्यादित क्षेत्रात जीवन जगत नसून, त्या आसपासच्या परिसराचा, समाज जीवनाचा, व्यापक पातळीवर आत्मियतेने शोध घेत असल्याची जाणीव त्यांच्या काही कादंबऱ्यांतून येते. उदा. कुमुदिनी प्रभावळकर यांची 'निर्माल्यातील कळी' ही कादंबरी.

समाजातील अनेक घटकांच्या अनेक अडचणींचा लेखिका आपल्या कादंबऱ्यातून परामर्श घेताना दिसतात. त्यांच्यासमोर कधी धार्मिक प्रश्न आहे, कधी राजकीय प्रश्न आहे, कधी रेल्वे कामगारांची चळवळ आहे तर कधी परदेशातील वातावरणाने भारलेले तरुण त्यांच्यासमोर येतात. अशाप्रकारे कठोर आत्मपरीक्षणाचं सामर्थ्य दाखवून प्रांजळ आत्मनिवेदन स्त्रियांनी केले आहे.

इ. स. १८५० ते १९५० या कालखंडातील स्त्रियांच्या कादंबऱ्यांचे विषय हे मध्यवर्गीय कटुंबांशी, स्त्री जीवनाशी एवढंच नाही तर राष्ट्रीय जीवनाशीही संबंधित असल्याचं आपणास दिसून येतं. स्त्रियांनीच स्त्रिच्या भावसंवेदनाची केलेली मांडणी आणि स्त्री सुलभ भावनांचं घडविलेलं दर्शन हे लेखिकांच्या कादंबऱ्यांचं एक खास वैशिष्ट्य आहे.

15185

व्यक्तिगत स्त्रीजीवन, सामाजिक जीवन, सांस्कृतिक जीवन, मानवी जीवन ह्या साऱ्याच जीवनांगांची लेखिकांनी आपल्या कादंबऱ्यातून दखल घेतलेली दिसते.

या कादंबऱ्यांमध्ये सुक्ष्म मनोविश्लेशणाबरोबर वस्तुस्थितीचा आधार घेऊन प्रांजळपणाने मांडणी केलेली आहे. स्त्रियांनी आपल्या कादंबऱ्यांतून हक्कांसाठी भांडण्याचा आवेश जरी दाखवला सला तरी तेवढीच हिंदू स्त्रीची शालिनताही राखली आहे.

लेखिकांनी कादंबरी लेखनाच्या तंत्रातही अनेक प्रयोग केले. सरळ निवेदनाचा एकच एक सूर आळविण्यापेक्षा त्यांनी लेखनतंत्रात विविधता आणली. कुठे आत्मनिवेदन आहे ('देवलीला', 'माझे बाळ ते') तर कुठे एखाद्या मैत्रिणीनं आपल्या मैत्रिणीची रंगविलेली जीवनकथा आहे (सुशिला), केव्हा लहान बहीण मोठ्या ताईचा जीवनवृत्तांत सांगताना दिसते (पालखीचा गोंडा) तर कुठे आईनं आपल्या मुलीसाठी स्वत:चं जीवनचरित्र लिहून ठेवलेलं दिसतं (बाळूताई धडा घे), कुठे रोजनिशी सारख्या नोंदीतून कथानक गुंफलं जातं (विरलेले स्वप्न) तर कुठे पात्रमुखी निवेदनातून कथानकाचे धागे उलगडलेले दिसून येतात. (जागरी) कधी निरनिराळ्या विषयांवरील पात्रांच्या चर्चेत रंग भरलेला आढळतो (लग्नाचा बाजार). असे हे लेखनतंत्रातील निरनिराळे प्रयोग लेखिकांच्या लेखनकौशल्याचं दर्शन घडवितात.

लेखिकांच्या कादंबरी क्षेत्रातील यशात त्यांच्या शैलीचा फार मोठा वाटा आहे. व्यक्तिमनातील दु:खाचा कानोसा घेण्याइतकी हळूवार, अन्यायाबद्दलची चीड व्यक्त करण्याइतकी प्रखर तरुण-तरुणींच्या भावनांना स्पर्श करण्याइतकी ज्वलंत भाषाशैली हे त्यांच्या कादंबऱ्यांचं महत्वाचं वैशिष्ट्यं आहे.

इ. स. १८५० ते १९५० या कालखंडातील स्त्रियांच्या कादंबऱ्यांचा सर्वांगानं विचार करता त्यांच्यातील विषयाची विविधता आपल्या नजरेस पडते. त्यांनी आपल्या

मर्यादित अनुभवविश्वातील विशिष्ट अनुभूती मोठ्या समर्थपणे मांडलेल्या दिसतात. लेखिकांनी स्त्री मनाचा सुक्ष्मपणे घेतलेला कानोसा, स्त्रीजीवनातील दु:खाचा घेतलेला शोध, मध्यमवर्गीय कुटुंबातील आचारविचार, हेवेदावे यांचं घडविलेलं दर्शन, समाजातील कडक निर्बंधाविरुद्ध उठवलेलं काहूर, जाचक रुढींकडे सर्वांचं लक्ष वेधण्याचा केलेला प्रयत्न ह्या साऱ्याच गोष्टी तत्कालिन स्त्री जीवनावर प्रकाश तर टाकतातच पण त्याचबरोबर स्त्रियांमध्ये होत असलेल्या बदलाची जाणीवही करुन देतात. हे सारं लक्षात घेता स्त्रियांची या क्षेत्रातील कामगिरी खरोखरच प्रशंसनीय ठरते.

### ४.२ स्वातंत्र्योत्तर कालखंड :-

१९५० नंतरच्या स्त्रियांच्या कादंबरी लेखनाचा आढावा घेताना भारताच्या स्वातंत्र्यामुळे बदललेले समाजजीवन प्रथम विचारात घेणे आवश्यक आहे. या घटनेने जीवनाच्या शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक, वैज्ञानिक सर्वच क्षेत्रात अर्थपूर्ण प्रगती झाली व त्याचा फायदा स्त्रीलाही मिळाला. स्त्रीने शिक्षण, संशोधन, ललितकला, वैद्यक, स्थापत्य, कृषी, विज्ञान, राजकारण, समाजकारण अशा सर्वच क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची नाममुद्रा उमटवली. त्यामुळे १९५० नंतरच्या काळात स्त्रियांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांमध्ये संख्यात्मक वाढ तर झालीच पण गुणात्मक वाढही झालेली दिसून येते.

या काळात रंजनवादी गोड प्रेमप्रकरणांनी सजलेल्या कादंबऱ्या लिहिणाऱ्या अनेक लेखिका होत्या. तसेच स्त्री समस्या मांडणाऱ्याही होत्या. १९७५ नंतर तर कादंबरी क्षेत्रात स्त्रीवादी भूमिकेतून स्त्री जीवनाचा विचार मांडणारा प्रवाहही निर्माण झाला. यामध्ये निर्मला देशपांडे, कमल देसाई, शांता गोखले, रेखा बैजल, सानिया, आशा बगे, गौरी देशपांडे अशा काही मोजक्या लेखिकांची नावे घेता येतील. या

काळात स्त्रियांच्या कादंबरी क्षेत्रात सामाजिक कादंबरी मोठ्या प्रमाणात अवतरली. त्याचबरोबर त्यांनी पौराणिक, ऐतिहासिक, चरित्रात्मक, ग्रामीण असेही कादंबरी लेखन केलेले दिसते.

**सामाजिक कादंबरी :-**

१९५० नंतरच्या स्त्रियांच्या कादंबरली लेखनात सामाजिक कादंबऱ्यांची संख्या खूप मोठी आहे.

या त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये कुटुंबातले परस्परसंबंध, आर्थिक परिस्थिती, कष्टमय निराशा हेच अनुभवविश्व असल्याचे दिसून येते. विभावरी शिरुरकरांनी जाई (१९५३), शबरी (१९६३), उमा (१९६६) या कादंबऱ्यांमधून स्त्रीच्या मनाचे पदर उलगडून दाखवले आहेत. मालतीबाई दांडेकरांची 'वास्तु' (१९६५) व ज्योत्स्ना देवधर यांची 'घर गंगेच्या काठी' (१९६७) या कादंबऱ्या 'घर' या संकल्पनेभोवती फिरताना दिसतात. त्यानंतरच्या 'चिमणीच घर मेणाचं' (१९७५), 'एक श्वास आणखी' (१९८६), 'बुटक्या सावल्या' इ. कादंबऱ्यांतून ज्योत्स्नाबाईंनी कुटुंबामध्ये निर्माण होणारा संघर्ष, ताणतणाव तसेच स्त्री समोरची अनेक आव्हाने अनेक रुपांतून व्यक्त केली आहेत. ज्योत्स्नाबाईंबरोबरच या काळातील अशीच एक वेगळी क्षमता असलेली लेखिका म्हणजे निर्मला देशपांडे. त्यांच्या 'कथा एका बकुळची' (१९९२), 'टिकलीएवढं तळं' (१९९६), 'सलत सूर सनईचा' (१९९६) या कादंबऱ्यांतून कुटुंबजीवनाचे वेगवेगळे पैलू तसेच संस्थानी वातावरण आले आहे. शांता गोखले यांची रीटा वेलिणकर (१९९०), लीला श्रीवास्तव यांच्या 'नग्न प्रश्न' (१९७३), गढूळ पाण्यातील मासोळ्या (१९७१) या कादंबऱ्या स्त्री-पुरुष संबंधांभोवती फिरताना दिसतात. आशा कर्दळे यांची 'अपवाद' (१९९९) आणि गिरिजा कीर यांची 'अभिशाप' या कादंबऱ्यांमध्ये पती-पत्नी यांचे विवाहबाह्य संबंध हा विषय आलेला

दिसतो. तसेच शैलेजा राजे यांची 'खणानारळाची ओटी', ज्योत्स्ना देवधर यांची 'घर गंगेच्या काठी' अशा कादंबऱ्या कुटुंबातील विविध नातेसंबंधांचे वर्णन करताना कुटुंबाचे चित्रच आपल्यासमोर आणतात. काही लेखिकांनी जात, धर्म, श्रद्धा-अंधश्रद्धा या विषयांवर लेखन केलेले दिसते. या संदर्भात विनया खडपेकर यांच्या 'भिंती' (१९८५) या कादंबरीचे उदाहरण देता येईल.

अशाप्रकारे स्वातंत्र्योत्तर काळात लेखिकांनी कुटुंबातले, समाजातले अनेक प्रश्न आपल्या कादंबऱ्यांतून हाताळलेले दिसतात. या कादंबऱ्यामध्ये जरी संख्यात्मक वाढ झालेली असली तरी तोचतोपणा आलेला दिसतो. वास्तवाचे दर्शन घडवण्याच्या दृष्टीने या कादंबऱ्या कमी पडलेल्या दिसतात. परंतु, या सर्वसाधारण सामाजिक कादंबऱ्यांपेक्षा स्वत:चे अस्तित्व, सामर्थ्य जाणणारी स्त्री आपल्याला गौरी देशपांडे, सानिया, आशा बगे, शांता गोखले, शैला बेल्ले, शांता निसळ अशा अनेक लेखिकांच्या कादंबऱ्यांतून दिसते.

त्यानंतर १९७५ हे साल आंतरराष्ट्रीय स्त्री वर्ष म्हणून साजरे केले गेल्यामुळे त्याचे पडसाद स्त्रियांच्या साहित्यावर उमटलेले दिसून येतात. १९७५ नंतरच्या कालखंडात एक स्त्री म्हणून स्त्रियांच्या लेखनातून स्त्रीच्या बदललेल्या जीवनाचे चित्रण अधिक प्रमाणात दिसून येते.

१९७५ नंतर लेखन करणाऱ्या गौरी देशपांडे या एक महत्वाच्या लेखिका आहेत. त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून स्त्री जीवनाची विविध रुपे साकार केली आहेत. त्यांच्या 'गोफ', 'कारावासातील पत्रे' (१९८३), 'एकेक पान गळावया' (१९८०) या सारख्या कादंबऱ्यांतून त्यांनी जीवनाचे आदर्श न पाळणारी व जीवनाची निर्जिव चौकट मोडू पाहणारी अशी बंडखोर स्त्री चित्रित केली आहे. त्यांच्या लेखनाबद्दल बोलताना अविनाश सप्रे म्हणतात, 'जीवनाच्या मूलाकारापर्यंत वाचकाला नेवून त्याचे

अस्तित्वभान प्रगल्भ करण्याचे सकस, समर्थ, सर्जनशील आणि वैचारिक सामर्थ्य आणि संस्कार त्यांच्या वाचनातून मिळते हे त्यांचे मोठेपण आहे. ' [१] यांच्याबरोबरच शांता गोखले यांची 'रीटा वेलिणकर' (१९९०), सानिया यांच्या 'आवर्तन' (१९६६), 'स्थलांतर' (१९९४), शांता निसळ यांची 'बेघर' (१९७६), अंबिका सरकार यांची 'एका श्वासाचं अंतर' (१९९०) या कादंबऱ्या आजच्या स्त्रीची मानसिक स्पंदने, बदलत गेलेली कुटुंबजीवनाची वीण उलगडताना दिसतात.

एकंदरित आजच्या आधुनिक स्त्रीचे चित्रण, तिचे बदलत चाललेले व्यक्तिमत्व, तिच्या आयुष्यात निर्माण झालेले विविध प्रश्न, तिची मानसिकता, वेगवेगळ्या नातेसंबंधात तिचे असलेले रुप, तयार झालेली नवी प्रतिमा इ. अनेक गोष्टी स्त्रियांच्या सामाजिक कादंबऱ्यांमधून प्रतिबिंबीत झालेल्या दिसतात.

**पौराणिक कादंबरी :-**

मराठी पौराणिक कादंबरीच्या क्षेत्रात स्त्रियांमध्ये सुमती क्षेत्रमाडे, अरुणा ढेरे, सरोजिनी शारंगपाणी, आशा बगे, शुभांगी भडभडे, सुमती इनामदार, शैला बेल्ले, रेखा बैजल, लीला दीक्षित इ. नी लेखन केले. योगेश्वर, श्रीकृष्ण, नलदमयंती, मैत्रेयी, उर्वशी, द्रौपदी, गांधारी, परशुराम, दुष्यंत–शकुंतला इ. व्यक्ती या पौराणिक कादंबऱ्यांचा विषय झाल्या आहेत.

शुभांगी भडभडे यांची 'पद्मगंधा' ही दुष्यंत–शकुंतला यांचा विवाह या विषयावर आधारित आहे तर श्रीकृष्ण या विषयावरही त्यांनी 'पूर्णविराम' व सुमती क्षेत्रमाडे यांनी 'योगेश्वर श्रीकृष्ण' ही लिहिली तर गांधारी या विषयावर सुमती क्षेत्रमाडे यांनी 'सत्यप्रिय गांधारी' (१९८७) तर सरोजिनी शारंगपाणी यांनी 'गांधारी' (१९९६) ही कादंबरी लिहिली. त्याचप्रमाणे पुराणकाळातील भगवान परशुरामावर

मृणालिनी देसाई यांनी भगवान परशुराम (१९७०) तर लीला दीक्षित यांनी 'स्वामी अपरान्ताचा' (१९९३) या कादंबऱ्या लिहिल्या त्याबरोबरच सुमती इनामदार यांची 'अश्वत्थामा' (२०००) आशा बगे यांची 'कुरुक्षेत्र' (१९९६), अरुणा ढेरे यांच्या 'उर्वशी' (१९८९) आणि मैत्रेयी (१९८७), शैला बेल्ले यांची 'दक्षिणायन' (१९९४), रेखा बैजल यांची 'युगावर्त' (१९९४), द्रौपदीच्या जीवनावर आधारित रेणू देशपांडे यांची 'सम्राज्ञी' (१९७७), मधुवंती सप्रे यांची 'द्रौपदी' (१९९१), सुमती क्षेत्रमाडे यांची 'याज्ञसेनी' (१९८८) अशा अनेक पौराणिक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. या कादंबऱ्यामध्ये एकच व्यक्ती आणि अनेक अविष्कार असा प्रकार मोठ्या प्रमाणात दिसून येतो.

**ऐतिहासिक कादंबरी :–**

१९६० ते ७० मध्ये स्त्रियांचे ऐतिहासिक कादंबरी लेखन फारसे झालेले दिसत नाही. परंतु, १९७० ते २००० या काळात नयनतारा देसाई, मृणालिनी देसाई, संजिवनी खेर, शान्ता योगी, विलासिनी आरेकर, सुशिला खेडकर, भारती सुदामे, नंदा खरे इ. लेखिका ऐतिहासिक कादंबरी लेखन करताना दिसतात.

ऐतिहासिक कादंबरीच्या बाबतीतसुद्धा व्यक्ती एक अविष्कार अनेक असा प्रकार काही वेळेला दिसतो. राजा अशोकाच्या जीवनावर संजिवनी खेर यांची 'देवानाम प्रिय', मालतीबाई दांडेकर यांची 'चक्रवर्ती' (१९८१) या कादंबऱ्या दिसतात. तर राणी चन्नमावर नयनतारा देसाई यांनी 'समिधा' तर शांता योगी यांनी स्वामिनी (१९९७) या कादंबऱ्या लिहिल्या. इतिहासातील काही उपेक्षित व्यक्तींना न्याय देण्यासाठी किंवा त्यांच्यावरील कलंक दूर करण्याच्या हेतूने सुशिला खडपेकर यांनी शापिता (२०००) नलिनी सहस्त्रबुद्धे यांची 'फुलंगी' यासारख्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या तर शैलेजा राजे यांची 'वतन' (१९७९), मृणालिनी जोशी यांची

'मुक्ताई' (१९७६), लीला दीक्षित यांची 'चंदनवेल' यांचा समावेश करता येईल. लीला गोळे यांनी तर संतचरित्रावर सर्वाधिक कादंबऱ्या लिहिण्याचा मान मिळविला आहे. संतांच्या शिकवणुकीचा पगडा अजूनही जनमाणसावर प्रचंड प्रमाणात असल्यामुळे या लेखनात नित्य भर पडत असताना दिसते.

त्याचबरोबर आशा कर्दळे यांची 'विदेश' (१९९८), शुभदा गोगटे यांची 'खंड्याळ्याच्या घाटासाठी' (१९९२) या सारख्या ऐतिहासिक काळ जिवंत करणाऱ्या कादंबऱ्याही या काळात लिहिल्या गेल्या.

**ग्रामीण कादंबरी :-**

स्त्रियांच्या ग्रामीण कादंबऱ्यांचा विचार करता वैदर्भिय लेखिका प्रतिमा इंगोले यांची 'बुढाई' (१९९९) ही ग्रामीण जीवनावरची आणि वऱ्हाडी बोलीतली कादंबरी महत्वपूर्ण आहे. या व्यतिरिक्त स्त्रियांच्या कादंबरी लेखनात ग्रामीण कादंबऱ्यांची संख्या फारशी आढळत नाही.

**राजकीय कादंबरी :-**

स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांच्या राजकीय कादंबऱ्याही फारशा दिसून येत नाहीत. कमल देसाई यांची 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' (१९६४) ही कादंबरी राजकारणाच्या पार्श्वभूमीवरील आहे. आजही जुन्या राजकीय आंदोलनांचे उल्लेख स्त्रियांच्या कादंबऱ्यांमधून येतात पण समकालीन आणिबाणी, सत्तांतरे, पंजाब, आसामचे आंदोलन, काश्मीर प्रश्न याकडे पार्श्वभूमी म्हणून कोणी पाहात नाही. राखीव जागा, नामांतर प्रश्न या आंदोलनांची दखलही मराठी कादंबरीत फारशी घेतलेली दिसत नाही.

**वैज्ञानिक कादंबरी :-**

अलिकडे मराठी वाङ्मयाच्या प्रांगणात विज्ञान कथा, विज्ञानकादंबरी हा नवीन प्रवाह हळूहळू प्रवेश करताना दिसत आहे. परंतु, त्यात स्त्रियांनी लिहिलेल्या विज्ञानाधिष्ठित कादंबऱ्यांची संख्या फार कमी आहे. रेखा बैजल यांची 'अग्निपुष्प' (१९८३) व शुभदा गोगटे यांची 'यंत्रायणी' (१९८१) या दोन कादंबऱ्यांचा या कालखंडातील विज्ञानाधिष्ठित कादंबऱ्यात समावेश होतो.

**मनोविश्लेषण करणारी कादंबरी : -**

स्वातंत्र्योत्तर काळात मनोविश्लेषणात्मक कादंबरी हा ही एक नवीन साहित्य प्रवाह मराठी साहित्यात नव्याने आला होता. लेखकांबरोबरच लेखिकांनीही मनोविश्लेषणात्मक कादंबरी लेखन केलेले दिसते. त्यामध्ये चंद्रप्रभा जोगळेकरांची 'संजिवनी' (१९६७), एन् ग्रुपने लिहिलेली 'काचापाणी' (१९७०), रेखा बैजल यांची 'देवव्रत' (१८८४), प्रतिभा रानडे यांची 'रेघोट्या' (१९९९) या कादंबऱ्यांचा समावेश होतो. तसेच आशा परुळेकर यांनी 'पुनर्जन्म' या संकल्पनेवर 'पुनर्जन्म' आणि 'वेड' (२०००) अशा दोन कादंबऱ्या मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून लिहिलेल्या दिसतात.

या कालखंडातील आणखी एक उल्लेखनीय लेखिका म्हणजे कमल देसाई. त्यांनी आपल्या 'काळा सूर्य' (१९६८) आणि 'हॅट घालणारी बाइ' (१९७०) या कादंबरीतून संज्ञाप्रवाहाचा वापर करुन एक वेगळ्या जातीचे, वेगळ्या जाणिवेचे कादंबरी लेखन केले व नवी वाट दाखवली. म्हणून त्यांच्याबद्दल बोलताना रेखा इनामदार साने म्हणतात, अस्तित्ववादी व अतिवास्तववादी जाणिवांची इतकी कलात्मक व परिणामकारक अभिव्यक्ती या एकाच लेखिकेला साधलेली आहे. या

तऱ्हेचा संवेदनस्वभाव आणि परिणतप्रज्ञ व्यक्तिमत्व अपवादानेच आढळते. यामुळे कमल देसाईंची कामगिरी मराठी कादंबरीच्या परंपरेत उठून दिसणारी आहे.[१०]

**या कालखंडातील स्त्रियांच्या कादंबरी लेखनाचे विशेष :-**

या कालखंडातील स्त्रियांच्या कादंबऱ्यांमधून त्या समकालीन आधुनिक जीवनरितीतील बरेवाईट पैलू प्रकाशात येतात. एकत्र कुटुंब पद्धतीचा होत चाललेला लोप, नोकरी अर्थार्जनाने स्त्रियांमध्ये वाढलेला आत्मविश्वास तसेच सामाजिक परिस्थितीमुळे किंवा अन्य कारणामुळे स्वत:चे निर्णय स्वत: घेऊन जगण्याची त्यांची आकांक्षा यासर्व गोष्टी त्यांच्या कादंबऱ्यांतून दिसतात.

या कादंबऱ्यातील नायिका कृत्रिम डामडौल, औपचारिक पातळीवर जगणे टाळतात. दैनंदिन जीवनातील वरवर क्षुल्लक वाटणाऱ्या बाबींचाही खूप खोल विचार करतात. त्यामुळे अत्यंतिक अंतर्मुखता, आत्ममग्नता नायिकांमध्ये आढळते. त्या अंतर्विश्वात एवढ्या गुरफटून जातात की त्यांचे बोलणे बंद होते, संवाद तुटत जातात रुढ अर्थाने त्या वेड्या ठरतात. उदा. रीटा वेलिणकरमधील 'रीटा'.

या कादंबऱ्यातील नायिकांना चाकोरीबद्ध जीवन नको असल्याने त्या परंपरेचे साचे तोडून–मोडून टाकतात त्यांचा मनोमन तिरस्कार करतात. त्यांना कळपातले एक होऊन जगायचे नसल्याने कळपात राहून जगणाऱ्यांविषयी उपहासात्मक स्वर लावलेला दिसतो. उदा : 'रीटा वेलिणकर' मध्येही सरस्वतीच्या कॉलनीत राहणाऱ्या स्त्रियांच्या अळणी, नीरस व एकसुरी जीवनाचे वर्णन येते.

या काळातील स्त्रियांच्या कादंबरी विश्वातील पात्रांच्या आयुष्यात त्यांना महत्वाचा दिलासा असतो तो मैत्रिचा. जिवाभावाच्या मैत्रिणी आणि मित्र प्रत्येक कादंबरीत आहेत. रीटा वेलिणकरमधील सरस्वती रीटाचे दु:ख जाणून घेऊ शकते. 'स्थलांतर' मधील रीना–नंदू यांचे स्वभावही भिन्न आहेत. पण रीना नंदूला

आत्मीयतेने घरात ठेवून घेते. मित्र–मैत्रीण या नात्याची वेगवेगळी कितीतरी परिपक्व रुपे गौरी देशपांडे यांच्या जवळपास प्रत्येक कादंबरीत दिसतात.

स्त्रियांच्या कादंबऱ्यांमधून प्रेमसंबंध, शरीरसंबंध यांचा खुलेपणाने उल्लेख केलेला दिसतो. कुठेही लपवाछपवी नसते.

उदा. रीटा वेलिणकर मधील रीटा–साळवी यांच्या लैंगिक संबंधाचे वर्णन लेखिका अगदी बेधडकपणे करते. तसेच डॅडी–मम्मी यांच्या संभोगाचे वर्णन करतानाही ती कचरत नाही. स्त्री–पुरुष संबंधांविषयीच्या वाङ्मयीन संकेतांना छेद देणारी ही वर्णने आहेत.

या काळातील लेखिकांनी आपल्या कादंबऱ्यामधून पृथगात्म असे प्रतिमाविश्व निर्माण केलेले दिसून येते.

उदा : रीटा वेलिणकरमधील डॅडींचे घर, गॅलरी, मम्मीच्या जॉर्जेटच्या साड्या. त्यावर फुलपाखराच्या ब्रोच, आरसा, लिपस्टिक, सरस्वतीच्या खोलीतील कुई–कुई आवाज करणारा पंखा इ.

या कालखंडातील कादंबऱ्यामधून कथनरीतींचे वैविध्यही आढळते. उदा. सानियांच्या 'स्थलांतर' व गौरी देशपांडे यांच्या 'गोफ' मध्ये पात्रमुखी कथनपद्धतीचा अवलंब केलेला दिसतो तर 'रीटा वेलिणकर' मध्ये पात्रमुखी निवेदनाबरोबरच कादंबरीच्या अखेरीस नाट्यसूचनांशी साध्यर्म्य असणारे कथन येते.

स्त्रियांच्या कादंबऱ्यात नायिकेच्या देहसौंदर्याला अतिशय महत्व असलेले दिसून येते. एखाद्या स्त्रीचे वर्णन करताना तिचा कांती नितळ, विपुल काळाभोर केशकलाप, भरदार आंबाडा, सपाटेबंद केस अशी तपशीलवार वर्णने या कादंबऱ्यांतून येताना दिसतात.

वाचकांच्या ऐंद्रिय संवेदनांना आवाहन करणारी वर्णने अनेक ठिकाणी आलेली दिसतात. उदा. नायकाचा पहिला स्पर्श, घट्ट मिठी, सर्वांगातून वीजेची लहर, गोड शिरशिरी, साडी कोणत्या पोताची, चंदेरी, तळहाताएवढी बुट्ट्याची, भरजरी जरीची, नाजूक किनार असलेली सिल्क इ.

खाण्यापिण्याच्या पदार्थांची रेलचेल या कादंबरी विश्वात आढळते. उदा. कणीदार साजूक तुपाचा वास दरवळत होता. बदामाचे काप वर पेरलेला केशरी शिरा घालून तिने चांदीची वाटी त्याच्यासमोर ठेवली. अशी वाचता–वाचताच त्या पदार्थांची चव आपल्या जिभेवर रेंगाळून जावी अशी वर्णने या कादंबऱ्यांमधून येतात.

या कादंबऱ्यात पावित्र्यसूचक व घरगुती प्रतिमांची पखरण झालेली दिसून येते. उदा. निरांजनातल्या वातीसारखी मंदपणे आपल्या संसारात तेवणारी आई, तुळस, चंदन इ.

गौरी देशपांडे, अंबिका सरकार, शांता गोखले, आशा बगे, सानिया किंवा प्रतिभा रानडे यांच्या साऱ्या कादंबऱ्यात मध्यवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय, शहरी स्त्रीच्या भावविश्वातील गुंतागुंत चित्रित केलेली आहे.

या कालखंडातील लेखिकांनी पत्ररुप कादंबऱ्याही लिहिलेल्या दिसतात. उदा. शैलेजा राजे यांची खणा–नारळाची ओटी, गौरी देशपांडे यांची कारावासातील पत्रे इ.

काही लेखिकांनी आपल्या कादंबऱ्यांप्रमाणे भाषाशैलीच्या बाबतीत नवनवीन प्रयोग केलेले दिसून येतात. उदा. 'काळा सूर्य' आणि 'हॅट घालणारी बाई' या कादंबऱ्यांमध्ये कमल देसाई यांनी वास्तवापलिकडील, अमूर्त वास्तवाचे दर्शन घडविणारी असंबद्ध, थोडीशी तुटक वाटणारी भाषा, संज्ञाप्रवाही पद्धतीने जाणारी भाषा वापरलेली दिसते.

अशाप्रकारे स्वातंत्र्योत्तर कालखंडात स्त्रियांनी आधुनिक जीवनपद्धतीमुळे निर्माण झालेल्या वेगवेगळ्या समस्या, आजच्या आधुनिक स्त्रीचे रुप, त्यांची बदललेली मानसिकता अशा समाजाच्या सर्व अंगांचा शोध घेण्याचा प्रयत्न आपल्या कादंबऱ्यांतून केलेला दिसून येतो.

**०५ सारांश**

साळूबाई तांबवेकरांनी १८७३ साली 'चंद्रप्रभाविरहवर्णन' या कादंबरीने मराठी वाङ्मयात स्त्री कादंबरीचे जे बीज पेरले होते त्याला अंकूर फुटून आज त्याच्या शाखा दाही दिशांना पसरलेल्या दिसतात. आज समाजाच्या सर्व अंगांना त्यांनी स्पर्श केलेला दिसून येतो. स्त्रियांनी आपल्या कादंबऱ्यांतून जाचक रुढींचे दर्शन घडविले, हिंदू कायद्याचा कठोरपणा नजरेस आणून दिला, वेश्यांच्या जीवनाकडे वाचकांचे लक्ष वेधून त्यातील विदारक सत्य दाखवण्याचा प्रयत्न केला, पारतंत्र्याच्या व्यथाही बोलून दाखविल्या, स्त्री शिक्षणाची आवश्यकता पटवून दिली, स्त्रियांचे समाजातील स्थान व माणूस म्हणून तिच्याकडे पाहण्याची दृष्टी वाचकाला दिली, वाचकाला इतिहासाची आठवण करुन दिली, परभाषांमधील वाङ्मयावर मराठी साज चढविला, बेकारीच्या प्रश्नाकडेही लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला अद्‌भूततेकडून बोधतेकडे वाचकाला वळवले आणि हे सारं सांगण्यासाठी त्यांची हाताळलेली रचनाशैली, कादंबरीचे वेगवेगळे प्रकार, रचनेचे विविध प्रयोग हे सारं पाहिलं असता त्यांनी कादंबरी क्षेत्रात मारलेली गरुडझेप खरोखरच कौतुकास्पद आहे असे वाटते. या त्यांच्या यशाबद्दल डॉ. सौ. प्रमिला भिरुड म्हणतात, 'थोड्याशा वाऱ्यानंही थरथरणारी, कोठेतरी आडोशाला वाढणारी, छोटीशी वेल जमिनीत मूळ धरल्यानंतर सर्वांगांनी बहरावी, फुलावी, स्वतंत्रपणे डोलू लागावी तशीच इ. स. १८७३ मध्ये मूळ धरलेली लेखिकांची कादंबरी अनेक अंगांनी बहरली, विकसित झाली.'[११]

# संदर्भ सूची


| | |
|---|---|
| १) रेखा इनामदार–साने | 'गेल्या अर्धशतकातील स्त्री–कादंबरीकारांची कामगिरी',<br>'गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी'<br>संपा. विलास खोले. लोकवाङ्मयगृह,<br>मुंबई. पृ. क्र. १२२ |
| २) डॉ. भालचंद्र फडके | 'मराठी कादंबरी'<br>प्रदक्षिणा खंड पहिला<br>संपा. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०<br>पृ. क्र. २०७ |
| ३) प्रा. डॉ. वसंत बिरादार | 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास'<br>कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा,<br>औरंगाबाद. पृ. २१३ |
| ४) दु. का. संत | 'मराठी स्त्री'<br>पद्मगंधा प्रकाशन, पुणे,<br>पृ. क्र. २८३ |
| ५) कुसुमावती देशपांडे | 'मराठी कादंबरी : पहिले शतक'<br>(१८५०–१९५०)<br>मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई पृ. क्र. २९७ |
| ६) कुसुमावती देशपांडे | तत्रैव पृ. क्र. ३०० |
| ७) कुसुमावती देशपांडे | तत्रैव पृ. क्र. २९४ |
| ८) दु. का. संत | 'मराठी स्त्री'<br>पद्मगंधा प्रकाशन पुणे. पृ. क्र. २८५ |
| ९) अविनाश सप्रे | स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरी :<br>प्रवृत्ती आणि प्रवाह<br>प्रदक्षिणा खंड दुसरा<br>संपा. अ. अ. कुलकर्णी कॉन्टिनेन्टल प्रकाशन,<br>पुणे. पृ. क्र. २५२ |

१०) रेखा इनामदार साने 'गेल्या अर्धशतकातील स्त्री कादंबरीकारांची कामगिरी', 'गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी' संपा. विलास खोले लोकवाङ्मयगृह, मुंबई. पृ. क्र. १२८

११) डॉ. सौ. प्रमिला भिरुड 'मराठी कादंबरी : स्त्रियांचे योगदान' स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, पृ.क्र. ३७०.

❑❑❑